31 JUL 2015

क्रमांक :-पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक/४३९/२००५.          मुंबई, दिनांक : /०७/२०१५.

विषय :- मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या दि. ०६.०७.२०१५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त पाठविणेबाबत.

* * * * *

मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीची बैठक, सोमवार, दि. ०६.०७.२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. तसेच सदरचे इतिवृत्त www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH → Others → Minutes of welfare meeting या शिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. तरी खालील अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरचे कार्यवृत्त त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

( अर्चना त्यागी )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई, (सस्नेह अग्रेषित)
सर्व अपर पोलीस महासंचालक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह).
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक (मो.प.वि. / न.वि.अ. / वि.सु.वि. / फोर्स वन / म.अ.प्र.वि. / -रा.रा.पो.बलसह)

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / मोटार परिवहन / अे.सी.बी. / बिनतारी संदेश).

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १६.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे (अ.अ.प्र.केंद्र, नागपूर / रा.रा.पो.बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंडसह).

उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक (निवृत्ती वेतन) / (आस्थापना -१).

सर्व उपसहायक पोलीस महानिरीक्षक.

सर्व कार्यासन अधिकारी.

पोलीस महासंचालक यांच्या लघुलेखिका.

प्रत,

प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा. यांचे कार्यालय, मुंबई.

२/- प्रभारी अधिका-यांनी सोबत जोडलेले इतिवृत्त उपरोक्त नमूद संकेतस्थळावर एक महिन्याच्या कालावधीसाठी प्रसिध्द करावे.

## सोमवार, दि. ०६.०७.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

** ** **

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी व्यवस्थापन समितीची बैठक या कार्यालयात **सोमवार, दि. ०६.०७.२०१५** रोजी **सकाळी ११,०० वाजता** आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी व्यवस्थापन समितीचे खालील पदाधिकारी उपस्थित होते :-

| **अ.क्र.** | **समिती सदस्यांचे पदनाम** | **पद** |
|---|---|---|
| १. | श्री. संजीव दयाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २. | श्रीमती अर्चना त्यागी, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म.रा., मुंबई **(अति. कार्यभार)** | उपाध्यक्ष |
| ३. | श्री. व्ही.डी. मिश्रा, अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), म.रा., मुंबई. | |
| ४. | श्रीमती अर्चना त्यागी, विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), म.रा., मुंबई. | सदस्य सचिव / कोषाध्यक्ष |
| ५. | श्री. आशुतोष डुम्बरे, विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), म.रा., मुंबई. | |
| ६. | श्री. कुलवंत कुमार सारंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक (नियोजन), म.रा., मुंबई. | |
| ७. | श्री, प्रशांत बुरडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई. | सदस्य |
| ८. | श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, औरंगाबाद. | सदस्य |
| ९. | श्रीमती नियती ठाकर, पोलीस अधीक्षक, परभणी . | सदस्य |
| १०. | श्री. निताराम कुमरे, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१३, नागपूर. | सदस्य |
| ११. | श्री. निकेश पी. खाटमोडे,अपर पोलीस अधीक्षक, अकोला. | सदस्य |
| १२. | श्रीमती माया देवरे, पो.नि. पुणे शहर. | सदस्य |
| १३. | श्री. आर्. जी. चिकणे, स. पो. उप नि., बि.सं. अहमदनगर. | सदस्य |
| १४. | श्री. एस्. बी. पाटील, पो.हवा./११७६, कोल्हापूर. | सदस्य |
| १५. | श्री. युवराज जयवंतराव वाघमारे, पो.शि./१७९ , हिंगोली | सदस्य |

अध्यक्षांनी सर्वप्रथम बैठकीतील सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

अध्यक्षांनी मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या मागील दि. २४ / ११ / २०१४ च्या बैठकीतील मुद्यांवरील पुर्तता अहवालाचा आढावा घेतला. त्यापैकी, **१)** पोलीस सबसिडीअरी कॅन्टींनकरिता लागणारा माल मास्टर कॅन्टींन मधून खरेदी केला जातो, त्यावेळी त्या मालावर आकारण्यात येणारा १२.५% व्हॅट कर रद्द करण्याबाबत शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावावर पाठपुरावा करण्यात येत असल्याचे, **२)** सेवानिवृत्त होणा-या पोलीसअधिकारी / कर्मचा-यांना व कल्याण निधीचे सभासद असणा-या लिपिकवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना सेवानिवृत्तीवेळी देण्यात येणारे स्मृतीचिन्हे् (घड्याळ)मे.अवॉर्ड गॅलरी, मुंबई यांचेकडून रु. ३४०+१२.५% व्हॅट कर या दराने १/७/२०१५ ते ३०/६/२०१६ या कालावधीसाठी खरेदी करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना दि.२/७/२०१५ च्या परिपत्रकान्वये कळविले आहे,असे विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांनी सांगितले.

२) त्यानंतर, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या सोमवार, दि. ०६.०७.२०१५ च्या सदर बैठकीसाठी घटकांकडून/कार्यासनांकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या एकूण १८ मुद्दयांवर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंति घेण्यात आलेल्या ठरावांचा तपशील सोबतच्या **"परिशिष्ट - अ"** मध्ये नमूद करण्यात आला आहे. तसेच, आकस्मिक उपस्थित झालेले मुद्दे, व त्यावरील चर्चेअंति घेण्यात आलेल्या ठरावांचा तपशील सोबतच्या परिशिष्ट **'आ'** मध्ये नमूद करण्यात आला आहे.

या बैठकीत ठेवण्यात आलेल्या सर्व मुद्यांवर चर्चा / निर्णय झाल्यानंतर, अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**---ooo---**

# परिशिष्ट - "अ "

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| **१.** | **२** | **३** | **४** |
| १. | पो.अ., धुळे | सांधे रोपण शस्त्रक्रिया ही अपघात झाल्यानंतरच कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत करण्यात येते. सदरची शस्त्रक्रिया ही कुठल्याही कारणास्तव सांधे बदलावे लागल्यास, कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत होण्यास विनंती आहे. तसेच, न्युमोनिया कावीळ, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भ पिशवीचे ऑपरेशन, व डोळे, नाक, कान व घशाचे आजारदेखील कुटुंब आरोग्य योजनेत समाविष्ट करावेत. | MPKAY ही सुविधा शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दि. १९/३/२००५ मधील नमूद विहीत आजारांसाठीच कार्यान्वित असल्याने सदर योजना इतर आजारांसाठी लागू करण्यासाठी शासनास प्रस्तावित करण्यात संयुक्तिक होणार नाही, त्यामुळे सदरचा **मुद्दा सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** |
| २. | पो.अ., सांगली | पोलीसांना होणारे सर्वसाधारण आजार, डोळ्यांचे सर्व आजार, नाक, कान, घसा यांचे सर्व आजार महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत समाविष्ठ करावेत. | अनु.क्र. १ प्रमाणे.. |
| ३. | पो.अ., सांगली | पोलीस कल्याण योजने अंतर्गत खरेदी करण्यात येणारे साहित्य/वस्तू खरेदीसाठी दरपत्रकाची मर्यादा ही रुपये १०००/- ऐवजी रुपये ५०००/- पर्यंत असणे आवश्यक आहे. | उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, क्र. भाखंस - १०९३ / २६३५ / उद्योग - ६, दि.१६/०७/१९९३ अन्वये शासनाने विहित केलेली दरकरारांव्यतिरिक्त वस्तूंची एकावेळी खरेदी करण्यासाठी किंमतीची रु. १,०००/- ची मर्यादा वाढवून रु. ५,०००/- करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा. |

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| ४. | पो.अ. लोहमार्ग नागपूर. | पोलीस अधिकारी/कर्मचारी कर्तव्यावर असतांना मयत झाल्यास त्यांच्या कुटुंबियांसाठी कुंटुंब आरोग्य योजना लागू करण्यात यावी. | शासन निर्णय, दि. २८.७ .२००६ नुसार लागू करण्यात आलेली म.पो.कु.आ. योजना ही फक्त सेवेत कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय आहे. तसेच, आतंकवादी हल्ल्यांत शहिद झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत म. पो. कु. आ. योजनेचा लाभ त्यांच्या कुटुंबियांना अनुज्ञेय आहे. त्याचप्रमाणे नक्षलवादी जिल्ह्यात नक्षलवाद्यांशी चकमकीत शहिद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना म.पो.कु.आ. योजनेचा लाभ देण्यात येतो. परंतु, कर्तव्यावर असताना आजारपणामुळे किंवा नैसर्गिक मृत्यू पावलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना म.पो.कु.आ.योजनेचा लाभ मिळण्यास शासनास प्रस्तावित करणे संयुक्तीक वाटत नाही. तथापि, दरोडेखोर, संघटीत गुन्हेगारीविरोधी कारवाई, आपात्कालीन काळात मदत करताना तसेच गुन्हेगार, व इतर समाजकंटकाविरुध्द कारवाई करताना मृत्यु पावलेल्या पोलीस अधिकारी /कर्मचा-यांच्या नियत सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत म.पो.कु.आ. योजनेचा लाभ त्यांच्या कुटुंबियांना देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यात येईल. |

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| ५ | पो.अ., लोहमार्ग नागपूर | शासकीय कामानिमित्त मुंबई येथे जाणाऱ्या (पोलीस महासंचालक कार्यालय / मंत्रालय ) पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या पोलीस विभागातील मंत्रालयीन कर्मचाऱ्यांना आझाद मैदान पोलीस स्टेशन येथील विश्रामगृह पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणे सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात यावे. | पोलीस आयुक्त, मुंबई यांना विनंती करण्यात यावी. |
| ६. | पो.आ., ठाणे शहर | ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकाऱ्यांकरिता विश्रामगृह आहे. त्या धर्तीवर नवप्रविष्ठ पोलीस कर्मचाऱ्यांकरिता परिमंडळनिहाय विश्रामगृह बांधण्यात यावे. | जागेची उपलब्धता, लाभार्थ्यांची संख्या, बांधकामाबाबतचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अंदाजपत्रक, तसेच त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीतील जमा रकमेचा तपशील, इत्यादी माहितीसह परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास मंजुरीसाठी सादर करण्याबाबत पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना कळविण्यात यावे. **सदरचा मुद्दा निकाली निघाला.** |
| ७. | पो.आ., ठाणे शहर | ज्युपीटर हॉस्पीटल, ठाणे हे महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत घेणे. | ज्युपीटर हॉस्पीटल, ठाणे या हॉस्पिटलची महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेअंतर्गत दि.१४.३.२०१४ व १५.३.२०१५ रोजी झालेल्या निवड समितीमध्ये ३९ रुग्णालयांची निवड करण्यात आली होती, परंतु सदर हॉस्पिटलला दुरध्वनीवरुन/मोबाईलद्वारे तसेच Mail द्वारे करार |

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| | | | करण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयात बोलाविण्यात आले असता सदर रुग्णालयाचे डॉक्टर करार करण्यासाठी आले नाहीत. तसेच श्री.के.पी.रघुवंशी, तत्कालीन पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी देखील ज्युपीटर हॉस्पिटमध्ये उपचार-पध्दती उत्कृष्ट असल्यामुळे सदर रुग्णालय पॅनलवर घेण्याबाबत शिफारस केली होती. परंतु, ज्युपीटर हॉस्पिटल सीजीएच्एस् दराने रुग्णांवर उपचार करण्यास तयार नसल्याने पॅनलवर येण्यास इच्छूक नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे मुद्दा चर्चेतुन वगळण्यात आला. **सदरचा मुद्दा निकाली निघाला.** |
| ८. | पो.आ., ठाणे शहर | ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता पोलीस स्कूल सारखे परिमंडळ निहाय शाळा उघडण्यास प्राधान्य देण्यात यावे. | ठाणे येथे पोलीस पब्लिक स्कुल कार्यरत असल्यामुळे परिमंडळनिहाय शाळा चालू करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे **सदरचा मुद्दा अमान्य करण्यात आला.** |
| ९. | पो.अ., लोहमार्ग, पुणे | पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्यात यावी. | लिपीकवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना जोखमीची कामें करावी लागत नसल्याने **सदरचा मुद्दा सर्वांनुमते अमान्य करण्यात आला .** |

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| १० | पो.अ., नागपूर ग्रामीण. | पोलीस महासंचालक, म. रा., मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८/२५८/रापोक्रिनिम/१६३/०४, दि.८. २. २०११ अन्वये दि.२.११.२०१० च्या पोलीस क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ठरावाप्रमाणे स्पर्धेमध्ये खाजगी अथवा सांघिक स्पर्धेतील खेळाडुंनी प्राप्त केलेल्या एकूण बक्षिसांच्या रकमेपैकी ८०% रक्कम खेळाडूंमध्ये वाटप करुन उर्वरीत २०% रक्कम मध्यवर्ती पोलीस क्रिडा निधीमध्ये जमा करण्याचे आदेश आहेत. परंतु स्पर्धेत भाग घेण्यासाठी आयोजकांकडे भरणा करावयाचे प्रवेश शुल्क हे घटकाच्या पोलीस कल्याण निधीतून अदा केले जाते. त्यामुळे खेळाडूंनी पटकावलेल्या बक्षिसांच्या रकमंपैकी ८०% रक्कम खेळाडूंमध्ये वाटप करुन उर्वरीत १०% रक्कम जिल्ह्याच्या पोलीस कल्याण निधीमध्ये तसेच १०% रक्कम मध्यवर्ती पोलीस क्रीडा निधीमध्ये जमा करण्यात यावेत. | खेळाडुंनी प्राप्त केलेल्या एकूण बक्षिसांच्या रकमेपैकी ८०% रक्कम खेळाडूंमध्ये वाटप करुन १०% रक्कम घटक पोलीस कल्याण निधीमध्ये व उर्वरीत १०% रक्कम मध्यवर्ती पोलीस क्रिडा निधीमध्ये जमा करण्यात यावी. **सदरचा मुद्दा निकाली निघाला.** |
| ११. | पो.अ., नागपूर ग्रामीण. | दि. ०२.६.२०१४ पासून जिल्ह्याच्या घटक प्रमुखांना रु.१,५०,०००/- वित्तीय मर्यादा देण्यात आली आहे. परंतु पोलीस अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या हितासाठी लहानात लहान उपक्रम राबवायचे असल्यास व वेळेच्या अभावी तसेच | वित्तीय मर्यादा दि. ३१.५.२०१४ च्या परिपत्रकान्वये वाढविण्यात आली असल्यामुळे त्यामध्ये आता पुन्हा वाढ करण्याची आवश्यकता नाही म्हणून **सदरचा मुद्दा सर्वानुमते अमान्य करण्यात आला .** |

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| | | आवश्यक वस्तूंचे वाढलेले दर पाहिल्यास सदर वित्तीय मर्यादा फारच कमी असल्याने जिल्ह्याच्या घटक प्रमुखाला रु.३,००,०००/- पर्यंत वित्तीय मर्यादा देण्यात यावी. | |
| १२. | समादेशक, रा.रा.पो.बल, गट-३, जालना | रा.रा.पो.बल, गट-३, जालना या गटाच्या चारही बाजुनी शहराची मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, जालना गटाची हद्द चारही बाजूने विकसीत रस्त्यांशी जोडलेली आहे. सदर गटाची रस्त्या-लगतची जागा उपक्रमाच्या व व्यवसायाच्या दृष्टीने भाडे तत्वावर देणे शक्य आहे. त्याकरिता सदर गटाच्या रस्त्यालगतच्या चारही बाजुंनी कॉम्प्लेक्सची व्यवस्था झाल्यास, गाळे भाडे तत्वावर देऊन निधी वृध्दींगत होण्यास मदत होईल. | चर्चेअंति **<u>सदरचा मुद्दा अमान्य करण्यात आला.</u> तथापि**, अतिक्रमण होवू नये यासाठी कल्याणकारी योजनेअंतर्गत शेड बांधणे व प्रशिक्षण विषयक उपक्रम इत्यादिंसाठी सदरच्या जागेचा उपयोग करावा.<br>**<u>सदरचा मुद्दा निकाली निघाला.</u>** |
| १३. | समादेशक, रा.रा.पो.बल, गट-३, जालना | गटामध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये मंगल कार्यालय हा उपक्रम सुरु केल्यास निधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते. त्यासाठी वरिष्ठ कार्यालयाची मंजुरी व मुबलक प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता आहे. | घटक प्रमुखांनी त्यासाठी जागेची उपलब्धता, लाभार्थ्यांची संख्या व घटक पोलीस कल्याण निधीमध्ये पुरेसा निधी उपलब्ध असल्यास अपेक्षित खर्चाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकासह परिपूर्ण सविस्तर प्रस्ताव पाठवावा. **<u>सदरचा मुद्दा निकाली निघाला.</u>** |

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| १४ | समादेशक, रा.रा.पो.बल, गट-३, जालना | गटामध्ये स्वीमींग पूल बनविल्यास निधीमध्ये वाढ करता येईल. परंतु त्याकरिता बजेटची आवश्यकता आहे. | स्वीमींग पूल बांधण्यास हरकत नाही, परंतु त्याची निगा राखणे, तसेच पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे उपक्रम यशस्वी होणार नाही, म्हणून **चर्चेअंति सदरचा मुद्दा अमान्य करण्यात आला.** |
| १५. | समादेशक, रा.रा.पो.बल, गट-३, जालना | गटामध्ये अस्तित्वात असलेल्या गॅस एजन्सीसाठी सिलेंडर वाहन, पिठाच्या दोन गिरण्यांसाठी बांधकाम व बैठक व्यवस्था, गट शेतीसाठी ट्रॅक्टर उपलब्ध होणे आवश्यक आहे तसेच विविध वस्तू भांडारामधून उधारी तत्त्वावर ग्रोसरी माल दिल्यास उत्पन्न वाढू शकते. उधारीची रक्कम मासिक पगारातून वसुली करण्याचे आदेश व्हावेत. | गॅस एजन्सीसाठी सिलेंडर वाहन, पिठाच्या दोन गिरण्यांसाठी बांधकाम, याबाबत पोलीस कल्याण निधी नियमावलीनुसार व घटक पोलीस कल्याण निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्याबाबत समादेशकांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, परंतु विविध वस्तू भांडारामधून माल उधारी तत्त्वावर देवू नये.<br>**सदरचा मुद्दा निकाली निघाला.** |
| १६. | संचालक पो.बि.संदेश पुणे. | पोलीस कल्याण निधी नियमावली २०१२ मध्ये हॉटेल मॅनेजमेंट शिक्षणाचा उल्लेख नसल्याने पुस्तक अनुदान किती दयावे याचा बोध होत नाही. | हॉटेल मॅनेजमेंट हा विषय तांत्रिक किंवा वैद्यकीय या प्रवर्गात बसत नाही, व त्या विषयातील पदवी ही बी.एस्सी. (हॉटेल मॅनेजमेंट) अशी दिली जाते. त्यामुळे सर्वसामान्य पदवी शिक्षणाकरिता (बी.एस्सी, बी.कॉम, बी.ए.) जे पुस्तक अनुदान (७५%, आणि त्यापेक्षा जास्त गुणधारकांना रु.३,०००/-) देण्यात येते, त्याप्रमाणेच अनुदान हॉटेल मॅनेजमेंट ह्या विषयातील शिक्षणासाठी देय होईल.<br>यापुढे, ८५% पेक्षा जास्त गुण असलेल्यांना |

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| | | | पुस्तक अनुदान देण्याबाबत नागपूर, भंडारा, सिंधुदुर्ग व बीड यांचेकडून सर्वेक्षण करुन घ्यावे. त्यानंतर त्यावर निर्णय घेण्यात येईल, असे अध्यक्षांनी निर्देश दिले. |
| १७. | पो.आ. नागपूर. | पोलीस कल्याण निधीमधुन पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना स्वतःचे घर पुरविण्यात यावे व त्याची परतफेड त्यांचे पगारातून करण्यात यावी. | शासनाने सध्या घरबांधणी अग्रिमामध्ये वाढ केली असल्याने सदरची मागणी **सर्वानुमते अमान्य करण्यात आली.** |
| १८ | का.क्र. २८-अे | पोलीस कल्याण निधी नियमावली मधील नियम ९ (१)(ब) अन्वये सभासदांची दोन मुले किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या पात्र व्यक्ती यांना पुस्तक अनुदान मंजूरीसाठी गुणपत्रिकांची साक्षांकित प्रत **एक महिन्याच्या आंत** सादर करणे आवश्यक आहे. तथापि, बोनाफाईड प्रमाणपत्र उशिरा प्राप्त होते. वैद्यकिय व अभियांत्रिकी शिक्षणाचे निकाल ऑनलाईन जाहीर होवून गुणपत्रिका प्राप्त होण्यास दीड ते दोन महिने लागतात, त्यामुळे सदरची मुदत वाढवून दयावी. | पुस्तक अनुदान मंजुरीसाठी गुणपत्रिकांची साक्षांकित प्रत एक महिन्याच्या आंत सादर करण्याचा **कालावधी वाढवून तो तीन महिने करण्यास** अध्यक्षांनी मान्यता दिली. सदरची सुधारणा सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता देय असलेल्या पुस्तक अनुदानासाठी लागू राहील. |

**परिशिष्ट - "आ"**

**आकस्मित उपस्थित झालेले मुद्दे.**

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.०६/०७/२०१५ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ |
| १. | समादेशक, रारापोबल गट क्र.१३ गडचिरोली कॅम्प, नागपूर. | गटातील नवप्रविष्ठ पोलीस शिपायांसाठी कल्याण निधीतुन बांधण्यात आलेल्या बॅरेक जवळील प्रसाधन गृहासाठी सेप्टी टँक बांधण्यासाठी मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीतुन रु. ३ लाख अनुदान मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर निर्णय होण्यास विनंती आहे. | सदर प्रस्ताव या कार्यालयाचे विचाराधीन असून लवकरच निर्णय घेण्यात येईल. |
| २. | पोलीस अधीक्षक, परभणी. | पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी परभणी येथे वॉटर फिल्टर प्लँट बांधणे आवश्यक आहे तसेच सभासदांचे पाल्यांना पुस्तक अनुदान देण्याचे आहे त्यासाठी मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीतुन रक्कम उपलब्ध होवून मिळण्याबाबत विनंती केली. | पोलीस अधीक्षक, परभणी यांनी त्यांचा घटक कल्याण निधी वृध्दींगत करुन नंतर कल्याणकारी योजना राबवाव्यात. |